अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com ।सोमवार, दि. २२ जुलै २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २९३ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## ज्यांच्याकडे पाहून भष्ट्राचाराची टीका केली ते तुमच्यासोबत : जयंत पाटील



✔ **जळगाव** : केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या आरोपांना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी प्रत्युत्तर दिले आहेत. केंद्रीय मंत्री अमित शहा आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर होते यादरम्यान अमित शहा यांनी शरद पवार यांना भष्ट्राचाराचे सरदार असे संबोधन केले. अमित शहांच्या याच टीकेवर जयंत पाटील प्रत्युत्तर देताना म्हणाले. गृह मंत्रीच असे बोलत आहे. त्यामुळे त्यांनी नीट अभ्यास करून तसेच माहिती करून बोलणं अपेक्षित आहे. आज पर्यंत शरद पवार साहेब यांच्यावर कुठलाही आरोप झालेला नाही त्यामुळे त्यांनी असे बोलणे चुकीचे आहे असे जयंत पाटील म्हणाले.

आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी म्हणून पूर्ण ताकदीने शरद पवार आणि उद्धव ठाकरे तसेच काँग्रेस महाराष्ट्रात निवडणूक लढणार आहे.त्यामुळेच अशा पद्धतीने हकनाक खोटे आरोप करण, आणि भाषण करण हा त्यांचा अजेंडा दिसतोय, देशात आणि महाराष्ट्रात सर्वात जास्त भ्रष्टाचारी कोण आहे याची वस्तुस्थिती जनतेला माहिती आहे असे जयंत पाटील म्हणाले.

पुढे जयंत पाटील म्हणाले, शरद पवार यांच्या विषयी अमित शहा यांनी केलेले वक्तव्य शरद पवार यांच्यासोबत सुरुवातीला जे लोक होते त्यांनाही लागू होतं मात्र ते आता भाजपसोबत जाऊन बसलेले आहेत असे म्हणत अजित पवार गटाकडे जयंत पाटीलांनी टीकेचे बोट दाखवले.



# अजितदादांनी फोडला ‘बॉम्ब’

## महायुतीला ‘दे धक्का’

## महाविकास आघाडीत खळबळ

✔ पुणे/प्रतिनिधी

**अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे सर्वेसर्वा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुण्यात कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात भविष्यातील निवडणुका या स्व:बळावर लढण्याच्या निर्णयाच्या घोषणेचा बॉम्ब फोडला. स्व:बळाच्या त्यांच्या या घोषणेतून महायुतीला दे धक्का बसला तर महाविकास आघाडीतदेखील खळबळ उडाली. दरम्यान लोकसभेप्रमाणे आपण विधानसभेची निवडणूक महायुतीसोबत लढणार आहोत. मात्र त्यानंतरच्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुका आपण स्व:बळावर लढणार आहोत, असे स्पष्टीकरणदेखील त्यांनी यावेळी मेळाव्यात दिले.**



अजित पवार यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुका हे स्वत:च्या पक्षाच्या ताकदीवर लढण्याचा राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा निर्णय जाहीर केल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांदरम्यान राज्याचे राजकारण वेगळ्या वळणावर जाणार आहे. त्यातून अजित पवारांच्या स्व:बळाच्या घोषणेनंतर मुख्य भाजप, एकनाथ शिंदे शिवसेना गट, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट तसेच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट आणि काँग्रेस या प्रमुख पक्षांमधील नेतेमंडळींचे डोळे विस्फारले आहेत.

पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मेळावा उपमुख्यमंत्री तथा या जिल्ह्याचे अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज रविवारी (ता.२१) कसबा विधानसभा मतदारसंघात पार पडला. या मेळाव्यात अजित पवार यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढायच्या की महायुतीबरोबर, यावर स्पष्टीकरण दिले आहे.

मागील दोन वर्षांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या नाहीत. त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याला या निवडणुका केव्हा होणार, असा प्रश्न पडला आहे. लोकसभा निवडणूक भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तीन पक्षांनी एकत्र येऊन लढवली.


या निवडणुकीत महायुतीला अपेक्षित जागा जिंकता आल्या नाहीत. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणूक महायुतीमधील तीनही पक्ष स्वतंत्र लढतील अशी शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात असतानाच अजित पवार यांनी विधानसभा आणि स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींबाबत आपली भूमिका मांडली आहे. पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मेळावा पार पडला. त्यात अजित पवार यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना जनतेपर्यंत पोचवण्याचे आवाहन त्यांनी केले.

### शरद पवारांचा अजितदादांवर ‘टायमिंग शॉट’



शरद पवार, सुप्रिया सुळे, रोहित पवार आणि अजित पवार हे कधी जाहीर सभांमधून, कधी बैठकांमधून, कधी पत्रकार परिषदांमधून तर कधी सोशल मीडियातून दोन्ही राष्ट्रवादीवाले आमने सामने येत आहेत. अजित पवारांच्या पिंपरी येथील मेळाव्यात काही कार्यकर्त्यांनी अजित पवारांना घड्याळ भेट दिले त्यावेळी, कार्यकर्त्यांनी भेट दिलेल्या घड्याळात १२ वाजण्यासाठी केवळ १० मिनिटांचा अवधी असल्याचं छायाचित्रातून दिसून येत आहे. त्यावरुन, आता शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने अजित पवारांवर निशाणा साधला आहे. स्वतः कमावलेल्या आणि हिसकावून घेतलेल्या गोष्टीत फार फरक असतो. त्यामुळेच तुम्ही हिसकावून घेतलेलं चिन्हं सुद्धा तुमचे १२ वाजायला १० मिनिटे शिल्लक आहे हेच दाखवत आहे, असे ट्विट एनसीपीच्या अधिकृत ट्विटर हँडलवरुन करण्यात आले आहे. त्यामुळे, या फोटोवरुनही अजित पवारांना लक्ष्य करण्याची संधी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाते नेते आणि पदाधिकारी साधत असल्याचं दिसून येतं.

### नेमक्यावेळी पडला बॉम्ब



अजित पवार यांचा गट राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात सामील होण्याच्या पार्श्वभूमीवर, सध्या राज्यात चर्चेला उधाण आले आहे. शिवाय विधानसभा निवडणुकीच्या हालचालींना वेग येतानाच रण चांगले तापले आहे. अजित पवार गट नेमका काय करणार?याबद्दलची उत्सुकता प्रचंड आहे. अशातच रविवारी (ता.२१) अजित पवारांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्व:बळावर लढण्याचा बॉम्ब फोडला. हा बॉम्ब त्यांनी नेमक्या वेळी फोडल्याचे मानले जात आहे.

### लाडक्या बहिणीचा लाडक्या भावाना थेट संदेश...



पुण्याच्या महिला मेळाव्यात बोलताना सुळे म्हणाल्या.. कशासाठी लढायचे ! काय निष्पन्न होते भांडणातून, काय निष्पन्न होत नाही, त्यातून फक्त कुटुता निर्माण होते. मला सांगितले असते, पक्ष, चिन्ह पाहिजे आहे. दिले असते. शून्यातून आयुष्य सुरू केले असत. आई-वडिलांनी शिकवलं कशाला? जर अडचणीच्या काळात आई-वडिलांसोबत उभे राहायचे नाही तर मग कधी उभे राहायचे? असे म्हणत सुळेंनी थेट वहिनी सुनेत्रा पवार आणि अजित पवारांना टोला लगावला.

### सुप्रिया सुळे बोलल्या ते अजितदादांना लागेल असंच!

लोकसभेत आम्ही जिंकायला हवे होते पण दुर्दैवाने पिपाणी आणि तुतारी यांच्यामध्ये आमचे खूप नुकसान झाले,कदाचित दुसरी तुतारी नसती, तर आज आमचा नऊ सीट लोकसभेवर निवडून आले असते पण रडीचा डाव असे म्हणत भाजपवर सुळेंनी अप्रत्यक्ष निशाणा साधला. तर पुढे अजित पवारांबाबत बोलताना सुळे म्हणाल्या, मागितले असते ना तर पक्ष चिन्ह काय सगळे देऊन टाकले असत, एकदा प्रेमाने मागून तरी बघितलं असतं, कधीच लढले नसते असा सरळ सुळेंनी बोलून दाखवले.

### ट्रकच्या धडकेत ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू



मृत रमेश श्रीमल

✔ **सोलापूर** : गांधीनगर अक्कलकोट रोड येथे पाई चालत जात असताना ट्रकने धडक दिल्याने एका ६५ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना आज सकाळच्या सुमारास घडली. याबाबत अधिक माहिती अशी की, रविवारी, २१ जुलै २०२४ रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास गांधीनगर येथील कमला को-ऑपरेटिव बँक कॉर्नर जवळ पाई चालत जात असलेल्या एका ६५ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला (ट्रक क्रमांक एम१३ एच ५५७७ )ने जोराची धडक दिली. रमेश कोटया श्रीमल (वय वर्ष ६५ राहणार विडी घरकुल हैदराबाद रोड सोलापूर) असे अपघातात मृत्यू झालेल्या ज्येष्ठ नागरिकाचे नाव आहे. त्यांना बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालय अर्थात सिविल हॉस्पिटल या ठिकाणी बालमणी श्रीमल सून यांनी दाखल केली असता उपचारापूर्वी झाल्याचे समजले. सदर या घटनेची नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.पायी चालत जात असताना ट्रकने धडक दिल्यामुळेया परिसरात एकच खळबळ उडाली होती. रमेश कोटया श्रीमल हे गांधीनगर येथील एका टेक्स्टाईल कारखान्यात कामाला होते.त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले दोन मुली असा परिवार आहे.

### विधानसभेला भाजपचे ६५ ते ७९ उमेदवार पाडणार : जरांगे-पाटील



✔ **पंढरपूर** : मनोज जरांगे पाटील यांनी रविवारी (ता. २१ जुलै) भाजपचे आमदार प्रवीण दरेकर यांच्या हल्लाबोल केला. तो करत असताना भाजपच्या गुप्त बैठकीचाही भांडाफोड केला. पंढरपुरातील एक घरात पाच ते सात मंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक झाली. त्या बैठकीत मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून भाजपचे ६५ ते ७९ उमेदवार शंभर टक्के पडणार आहेत, अशी चर्चा झाली आहे, असा गौप्यस्फोट केला आहे. त्यामुळे भाजपच्या विजय पराजयाचे गणित मांडणारी बैठक पंढरपुरातील कोणत्या नेत्याच्या घरी झाली, अशी चर्चा रंगली आहे.

प्रवीण दरेकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मनोज जरांगे पाटील यांनी भाजपच्या अंतर्गत बैठकीतील इतिवृत्ताचा भांडाफोड केला. ते म्हणाले, मराठा समाजाला ठरलेलं आरक्षण द्या. एवढंच आमचं म्हणणं आहे. मला आणि माझ्या समाजाला राजकारणात जायचं नाही. आम्हाला राजकारणात ओढू नका. पण, प्रवीण दरेकर यांच्यासारखे लोक बोलत राहिले तर भाजपला ६५ ते ७९ जागांवर शंभर टक्के नक्की फटका बसेल, हे विसरू नका.

तुम्हाला धडा शिकवण्याची शक्ती माझ्या मराठा समाजात नक्की आहे. लोक एक वेळ एकनाथ शिंदे यांचे उमेदवार निवडून देतील, अजित पवार यांचेही उमेदवार निवडून देतील. महाविकास आघाडीचेही उमेदवार निवडून देतील. तुम्हीचे ठराविक लोक निवडून देतील. पण, भाजपच्या ६५ ते ७९ लोकांचा कार्यक्रम ठरलेला आहे, असेही मनोज जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



ते 'सुराज्य'वाले आले की सांग!

### दौंडमधून उजनीत पुन्हा विसर्ग वाढला



✔ **सोलापूर/प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यासह उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पुन्हा पावसाला सुरूवात झाली आहे. त्यामुळे दौंडमधून धरणात विसर्ग वाढला आहे. रविवारी सायंकाळी दौंडमधून ८ हजार ५१६ क्युसेकचा विसर्ग धरणात येवून मिसळत आहे.त्यामुळे उजनी धरणातील पाण्याच्या पातळीची वाटचाल प्लसकडे होण्यास मदत झाली आहे.

काही दिवसांपूर्वी दौंडमधून २२ हजार क्युसेक्सचा विसर्ग धरणात येवून मिसळत होता.परंतु पुणे जिल्ह्यासह उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पास थांबला. त्यामुळे दौंडमधून विसर्ग कमी होवून तो दोन-अडीच हजारांवर आला.त्यामुळे धरणातील पाण्याची पातळी वजा २४ पर्यंतच स्थिर राहिली. आता पुणे जिल्ह्यासह उजनीच्या पाणलोट क्षेत्रात शनिवारपासून पावसाला पुन्हा सुरूवात झाली आहे.

त्यामुळे रविवारपासून विसर्ग पुन्हा वाढला.दिवसभरात पाणी आल्याने धरणातील पाण्याची पातळी वजा २२ टक्के झाली आहे. मुंबईसह पुणे परिसरात जोरदार पर्जन्यवृष्टी सुरू झाली आहे.त्यामुळे दौंडमधून विसर्ग वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली.तसे झाले तर उजनीची वाटचार प्लसकडे व्हायला लागेल.

